आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतली शपथ

- धरणांमधला गाळ काढण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

- युपीआयच्या माध्यमातून सोमवारपासून दिवसाला १० लाखापर्यंतचे व्यवहार करता येणार

**आणि**

- फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत दिव्या देशमुखला वाईल्डकार्डद्वारे प्रवेश

**<><><><>**

देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पदाची शपथ घेतली. नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राधाकृष्णन यांना शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, जगदीप धनखड, हमीद अन्सारी, एम. वेंकय्या नायडू हे माजी उपराष्ट्रपती, तसंच अमित शहा, नितीन गडकरी, राजनाथ सिंग, जे.पी.नड्डा, पीयुष गोयल हे केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.

उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत सी.पी. राधाकृष्णन यांनी प्रतिस्पर्धी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. उपराष्ट्रपतींनी आज राज्यसभेच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही स्वीकारला.

**<><><><>**

दिल्ली आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीत बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारी ईमेल मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आज दोन्ही ठिकाणी शोधमोहीम सुरू करण्यात आली.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या अधिकृत ईमेल पत्त्यावर ही मेल मिळाल्यानंतर त्वरेने दिल्ली उच्च न्यायालयाची इमारत रिकामी करण्यात आली, शोधमोहिमेत अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही, असं पोलिसांनी सांगितलं. मुंबई उच्च न्यायालयातही

सुरक्षेच्या कारणास्तव इमारत तातडीने रिकामी करण्यात आली. पोलिसांचं बॉम्बशोधक पथक कसून तपासणी करत आहे. अद्याप काहीही संशयास्पद सापडलं नसल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><>

धरणांमधला गाळ काढण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. मंत्रालयात काल झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी वित्त आणि नियोजन विभागाने केलेल्या सूचना विचारात घेऊन हे प्रस्ताव तयार करावे असंही सांगितलं. पूरनियंत्रणाबरोबरच धरणांची साठवण क्षमता वाढवण्यासाठी गाळ काढणं आवश्यक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><>

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज शहरातल्या परिस्थितीची पाहणी केली. काल पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळं शहराच्या अनेक भागात पाणी शिरल्यानं जनजीवन विस्कळीत झालं होतं. कचरा, सांडपाणी निचरा तसंच नालेसफाईच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचंही पालकमंत्र्यांंनी म्हटलं आहे.

<><><>

कोकणातले प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.  कोकणासाठी स्वतंत्र वाळू धोरण तयार करावं तसंच पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या M-Sand धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून अधिकाधिक प्रस्तावांना मंजुरी द्यावी अशा सूचना त्यांनी काल कोकण विभागीय आढावा बैठकीत दिल्या. कोकणातल्या ई-फेरफार नोंदी लवकर निकाली काढायची तसंच सर्वांसाठी घरे या योजनेसाठी शासकीय जमिनी उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया वेगवान करावी असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. कोकणातल्या देवस्थान जमिनींच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एक समिती नेमण्याबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

<><><>

प्रभादेवीला जोडणारा जुना ब्रिटिशकालीन उड्डाणपूल आज मध्यरात्रीपासून बंद ठेवला जाणार असून या मार्गाने होणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळवली जाणार आहे. या ठिकाणी नवा पूल बांधणार असल्याचं मुंबई महानगर विकास प्राधिकरणानं कळवलं आहे. शिवडी-वरळी उन्नत रस्ता प्रकल्पाला जोडण्यासाठी हा नवा पूल सोयीचा ठरणार आहे. या प्रकल्पामुळं बाधित होणाऱ्या रहिवाशांच्या विरोधामुळं हे काम अनेक दिवस रखडलं होतं.

**<><><>**

नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यातल्या ताहाराबाद-मुल्हेर मार्गावर काल संध्याकाळी झालेल्या अपघातात ३ मजूर ठार झाले असून अन्य १० जण गंभीर जखमी झाले आहेत. मजुरांची ने-आण करणाऱ्या टेम्पोची कारशी समोरासमोर धडक झाल्यामुळं ही दुर्घटना घडल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे. जखमी मजुरांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><>**

एन पी सी आय नं व्यक्ती ते व्यापारी या प्रकारातल्या युपीआय व्यवहारांची मर्यादा दहा लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. येत्या १५ तारखेपासून हा बदल लागू होईल. मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर मर्यादा असल्यामुळे ग्राहकांना व्यवहार विभाजित करून, किंवा धनादेश, बँक ट्रान्सफर यांसारख्या पारंपरिक पद्धती वापराव्या लागत होत्या, अशा क्षेत्रांना या निर्णयामुळे लाभ होणार आहे. मात्र, व्यक्ती ते व्यक्ती व्यवहारांची मर्यादा १ लाख रुपये प्रति दिवस अशी पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे. इतर क्षेत्रातही युपीआय व्यवहाराची मर्यादा वाढवण्यात आली आहे. भांडवली बाजार आणि विमा क्षेत्रात गुंतवणूक मर्यादा प्रति व्यवहार २ लाखांवरून ५ लाख रुपये, तर ई-मार्केटप्लेसवरील शासकीय व्यवहार मर्यादा १ लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे यूपीआयच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड बिल भरणा आता प्रति दिवस ५ लाख रुपयांपर्यंत करता येणार असून, सोने-चांदी दागिने खरेदी आता १ लाख रुपयांऐवजी २ लाख रुपयांपर्यंत करता येणार आहे. या सुधारित मर्यादांमुळे विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उच्च-मूल्य व्यवहारासाठी यूपीआय अधिक उपयुक्त ठरेल आणि यामुळे देशातल्या डिजिटल व्यवहारांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास एन सी पी आय ने व्यक्त केला आहे.

**<><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करातल्या नव्या सुधारणांतर्गत सरकारने सर्वसामान्यांना उपयुक्त अशा अनेक वस्तूंना करातून सूट देऊन एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड ---**

*(नवीन कररचनेनुसार, काही आवश्यक वस्तूंवरचा जीएसटी शून्य करण्यात आला आहे. यात अति-उच्च तापमानाचं दूध, प्री-पॅकेज अन्नपदार्थ, ब्रँडिंग न केलेले तांदूळ, गहू आणि डाळी तसंच, सर्व प्रकारचे ब्रेड यांचा समावेश आहे. वैयक्तिक आयुर्विमा आणि आरोग्य विम्याच्या हप्त्यालाही जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे.*

*वाहन क्षेत्रातल्या जीएसटी सुधारणांमुळे त्यातल्या टायर, बॅटरी, काच, स्टील, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध सहाय्यक उद्योगांना फायदा होणार आहे. या नव्या सुधारणांनुसार ३५०सीसी पर्यंतच्या बाईक्स, बसेस, चारचाकी गाड्या, १८०० सीसीपेक्षा कमी इंजिन क्षमतेचे ट्रॅक्टर आणि विविध सुट्या भागांच्या किंमतीत घट होणार आहे. पर्यायाने वाहन विक्री वाढून त्यामुळे पुरवठा साखळीतल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल. ऑटोमोबाईल क्षेत्रामुळे उत्पादन, विक्री, वित्तपुरवठा आणि देखभालीसारख्या विविध घटकांमधे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होते. जीएसटी सुधारणांमुळे मागणी वाढणार असून चालक, मेकॅनिक आणि वाहनाशी संबंधित इतर सेवा देणाऱ्या क्षेत्रांमध्येही रोजगार निर्मिती होणार आहे.)*

**<><><><>**

ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या भावनेतून, लातूर जिल्ह्यात रेणापूर तालुक्यातल्या वांगदरी गावच्या एका तरुणानं आत्महत्या केली. भरत महादेव कराड असं या तरुणाचं नाव होतं. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

दरम्यान, सरकारनं आतातरी मराठा आरक्षणासाठीचा अन्यायकारी शासन निर्णय रद्द करावा, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मीरमधे अतिवृष्टी आणि भूस्खलनाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने ५ कोटी रुपये अर्थसहाय्य दिलं. याबद्दल जम्मूकाश्मीरचे मुख्यमंत्री ओमार

अब्दुल्ला यांनी आभार मानले आहेत. जम्मूकाश्मिरमधे गेले काही दिवस मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली होती, तसंच दरडी कोसळल्यानं रस्ते आणि इमारतींचं नुकसान झालं.

<><><>

छत्तीसगढमध्ये आज सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. बिजापूर जिल्ह्याच्या नैऋत्य भागात माओवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली. या शोधमोहिमेवेळी माओवाद्यांकडून गोळीबार सुरू झाला. त्याला प्रत्युत्तर देताना झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. घटनास्थळावरून एक रायफल आणि स्फोटकंही जप्त करण्यात आली असून शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

<><><>

भारत-भेटीवर आलेले मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र राम गुलाम यांनी आज अयोध्येतल्या राम मंदिराला भेट देऊन प्रभू श्रीरामाची पूजाअर्चा केली. तत्पूर्वी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह कृषिमंत्री सूर्य प्रताप शाही यांनी त्यांचं महर्षी वाल्मिकी विमानतळावर स्वागत केलं.

<><><>

फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत महिला विश्वविजेती दिव्या देशमुखला या स्पर्धेत वाईल्डकार्डद्वारे प्रवेश मिळाला असून तिचा सामना थेट आठव्या फेरीत भारताचाच ग्रँडमास्टर डी गुकेश बरोबर होणार आहे.

विश्वविजेता डी गुकेश ने तुर्कियेचा एडिझ गुरेल याच्याबरोबरचा सामना गमावला. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आता त्याला उरलेले सर्व सामने जिंकावे लागतील.

भारताचा ग्रँडमास्टर निहाल सरीन यानं इराणच्या परहम मगसूदलू वर विजय मिळवत साडेपाच गुणांची कमाई केली आहे. भारताच्या अर्जुन एरगेसीला हरवणाऱ्या जीएम मॅथियास ब्लूबॉम शी त्याने बरोबरी केली आहे.

<><><>

कोकणाच्या दक्षिण पट्ट्यातल्या काही जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामानखात्यानं वर्तवली आहे. मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही

भागातही मेघगर्जनेसह जोरदार पाउस पडेल तसंच ताशी तीस ते चाळीस किलोमीटर वेगानं वारे वाहतील असा अंदाज हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><>//**